महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४५०
ई-मेल – desk2a@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक: २अ/एडीएम/ २०२२/२९४ दिनांक : 31 AUG 2022

प्रति,
सर्व प्राचार्य/संचालक,
सर्व व्यावसायिक तांत्रिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्था

विषय : **शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत (CAP)प्रवेशासाठी संस्थांची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत...**

संदर्भ : संचालनालयाचे पत्र क्रमांक १०/एडीएम/Intake Approval/२०२२/५७८, दिनांक ११.७.२०२२

वरील विषयाबाबत संदर्भाधीन पत्रान्वये व्यावसायिक तांत्रिक पदवी , पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी संस्थेबाबत शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता संबंधित शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार संबंधित विद्यापीठांकडून संलग्नता / समकक्षता प्रदान केल्याची माहिती अद्ययावत करुन दिनांक २३ जुलै २०२२ रोजीपर्यंत ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यास कळविले होते. मात्र शिखर परिषदेची मान्यता,शासन मान्यता, विद्यापीठांचे संलग्नीकरण नसल्यामुळे सदर माहिती अद्ययावत न करता आल्यामुळे संस्थांच्या मागणीवरुन सदर माहिती सादर करण्यासाठी दिनांक ३१.८.२०२२ रोजीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. तथापि सदरच्या मुदतीत काही संस्थांनी अद्यापपर्यंत त्यांची माहिती अद्ययावत केलेली नसल्याचे आढळून आले आहे.

सदर माहिती प्रवेशासंबंधी असल्याने माहितीची संवेदनशीलता व कालमर्यादा लक्षात घेता **संस्थांना शेवटची संधी म्हणून दिनांक ३.९.२०२२ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत माहिती अद्ययावत करण्यासाठी मुदत देण्यात येत आहे.** माहिती अद्ययावत करताना ती अचुक असेल याची विशेष दक्षता घेण्यात यावी. मंजूर प्रवेश क्षमतेची माहिती ही प्रवेश प्रक्रियेदरम्यान जागावाटपात दर्शविण्यात येणार असल्याने सदर माहितीत कोणतीही चुक झाल्यास व पर्यायाने प्रवेश प्रक्रियेमध्ये काही अडचण उद्भवल्यास त्यास सर्वस्वी संबंधित संस्थेचे प्राचार्य/संचालक जबाबदार राहतील.

उपरोक्त मुदतीत संस्थांनी माहिती अद्ययावत न केल्यास, परिणामस्वरुप संस्थेचा समावेश केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत न झाल्यास होणा-या परिणामास संबंधित संस्था सर्वस्वी जबाबदार असेल या बाबीची गांभीर्याने नोंद घ्यावी.

( डॉ.अभय वाघ )
संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत : मा.आयुक्त,राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,मुंबई यांना माहितीस्तव अग्रेषित

प्रत : माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी -सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,मुंबई, पुणे, नाशिक,औरंगाबाद,अमरावती,नागपूर - त्यांना कळविण्यात येते की, सदरहू परिपत्रक आपल्या स्तरावरुन आपल्या अधिनस्त सर्व व्यावसायिक तांत्रिक संस्थांच्या निदर्शनास आणून दयावे. तसेच आपल्या अधिनस्त सर्व व्यावसायिक तांत्रिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांनी सादर केलेली माहिती पडताळणी करुन व ती प्रमाणित करुन संकेतस्थळावर दिनांक ४.९.२०२२ सायं.५.०० वा.पर्यंत अद्ययावत करावी. त्यानंतर कोणत्याही संस्थेची माहिती अद्ययावत/प्रमाणित करता येणार नाही व सदरील माहिती राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षास सादर करण्यात येईल.